MET Bhujbal Knowledge City

**Institute of Engineering**

एम.इ.टी./बी.के.सी./आय.ओ.ई./जा.क्र./ दि. ३०/१२/२०२५

प्रती,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
सामनगाव रोड, नाशिकरोड,
नाशिक.

विषय : शुक्रवार, दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी "वीर बाल दिवस" ह्या विषयी जनजागृती ह्या उपक्रमाचा अहवाल सादर करणे बाबत..

संदर्भ :
१. संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. संचालक (तंत्र शिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. संचालक (कला), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. संचालक (ग्रंथालय), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. कुलसचिव (सर्व अकृषी विद्यापीठे), महाराष्ट्र राज्य

महोदय,

वरील संदर्भीय पत्रानुसार प्रत्येक महाविद्यालयात मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी केलेल्या आवाहनास प्रतिसाद तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन तसेच भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय यांचेकडून आलेल्या सुचनेनुसार भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी मुलांचे शौर्य, बलिदान व योगदान यांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने, केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालयाने शुक्रवार, दिनांक २६ डिसेंबर २०२५ हा दिवस देशभरात "वीर बाल दिवस" (VBD) म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतलेला आहे.त्या अनुषंगाने शुक्रवार, दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी "वीर बाल दिवस" ह्या विषयी जनजागृती करणे हा अभियान साजरा करण्याच्या सूचना करण्यात आलेल्या होत्या , तरी वरील सुचनेनुसार या विशेष उपक्रमाचे आयोजन मुंबई एज्युकेशनल ट्रस्टचे अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक-३ येथे शुक्रवार, दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता, "वीर बाल दिवस" ह्या विषयी जनजागृती पर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्याचा अहवाल आपणास सविनयसादर करीत आहोत.

कळावे,

डॉ. विजयकुमार वाणी
प्राचार्य

Adgaon, Nashik - 422 003
Mobile : (91) 09881100099 | Tel. : (0253) 2303515 | Telefax : (0253) 2303203
E-mail : enquiries@bkc.met.edu | www.metbhujbalknowledgecity.ac.in
ISO 9001-2008 certified MET is an NGO in Special Consultative Status with United Nations (ECOSOC)

# INTERNAL NOTE

| |
|---|
| Ref. No:- BKC/MET/IOE/Library/2025-26 |
| From:- Dr. Sambhaji Patil (Librarian) |
| To: - All Heads, MET-BKC-IOE, Nashik |
| Through: - Principal, MET-BKC-IOE, Nashik |
| Ref.:- संकीर्ण-२०२५/प्र.क्र. १३०/साशि, दिनांक १९ डिसेंबर २०२५ |
| Sub.: शुक्रवार, दिनांक **२६ डिसेंबर २०२५** रोजी *वीर बाल दिवस* साजरा करण्याबाबत… |
| Date:- २४ डिसेंबर २०२५ |

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन परिपत्रकानुसार शुक्रवार, दिनांक **२६ डिसेंबर २०२५** रोजी *वीर बाल दिवस* साजरा करण्याबाबत जनजागृती करण्याच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत.

**प्रति :**

१. संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. संचालक (तंत्र शिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. संचालक (कला), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. संचालक (ग्रंथालय), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. कुलसचिव (सर्व अकृषी विद्यापीठे), महाराष्ट्र राज्य

भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी मुलांचे शौर्य, बलिदान व योगदान यांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने, केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालयाने शुक्रवार, दिनांक **२६ डिसेंबर २०२५** हा दिवस देशभरात *वीर बाल दिवस (VBD)* म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतलेला आहे. याअनुषंगाने राज्य व जिल्हा स्तरावर विविध उपक्रमांचे आयोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सोबत सचिव, महिला व बाल विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र राज्य यांना लिहिलेले दिनांक **१०/१२/२०२५** चे पत्र व त्यासोबतचे सहपत्र जोडण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने, दिनांक **१०/१२/२०२५** रोजी प्राप्त मार्गदर्शक सूचनांनुसार आपल्या अधिपत्याखालील महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, उपक्रम व जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्याची विनंती करण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, **शुक्रवार, दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता**, प्रथम वर्ष अभियांत्रिकी वर्गखोलीमध्ये *"वीर बाल दिवस – जनजागृती"* या विषयावर माहितीपर व्याख्यान व खालीलप्रमाणे उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमास सर्व विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून आपला सहभाग नोंदवावा. आपली उपस्थिती हीच या कार्यक्रमाची यशस्वीता व शोभा ठरेल. सदर कार्यक्रमाअंतर्गत आपल्या विभागामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा संक्षिप्त अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| **डॉ. संभाजी पाटील** | **प्रा. योगेश पाटणी** | **डॉ. विजयकुमार वाणी** |
| ग्रंथपाल | राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी | प्राचार्य |

प्रत : सर्व विभाग प्रमुख

दिनांक: २९ डिसेंबर २०२५

**अहवाल - "वीर बाल दिवस – २०२५" - शुक्रवार, दिनांक २६ डिसेंबर २०२५**

दिनांक : **शुक्रवार, दिनांक २६ डिसेंबर २०२५,**

आयोजक : राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभाग

**आयोजक:** राष्ट्रीय सेवा योजना आणि **मध्यवर्ती ग्रंथालय, एमईटी अभियांत्रिकी महाविद्यालय, भुजबळ नॉलेज सिटी, नाशिक**

भारत हा विविधतेने नटलेला, समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभलेला व शौर्य, त्याग आणि बलिदानाच्या परंपरेने उजळलेला देश आहे. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात, सामाजिक सुधारणांमध्ये तसेच राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत बालकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे व प्रेरणादायी राहिले आहे. इतिहासाच्या पानांत वीर बालकांच्या शौर्यकथा सुवर्णाक्षरांनी लिहिल्या गेल्या असून त्या आजही नव्या पिढीला राष्ट्रप्रेम, धैर्य व नैतिक मूल्यांची शिकवण देतात.

भारत सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालयाने भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी बालकांचे शौर्य, बलिदान व योगदान यांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने **२६ डिसेंबर हा दिवस "वीर बाल दिवस" (Veer Bal Diwas)** म्हणून देशभर साजरा करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या दिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, नैतिक मूल्ये, सामाजिक बांधिलकी, इतिहासाची जाण तसेच राष्ट्रासाठी कार्य करण्याची प्रेरणा निर्माण करणे हा मुख्य हेतू आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन परिपत्रकानुसार व प्राप्त मार्गदर्शक सूचनांनुसार **MET Bhujbal Knowledge City's Institute of Engineering (MET-BKC-IOE), नाशिक** येथे शुक्रवार, दिनांक **२६ डिसेंबर २०२५** रोजी **"वीर बाल दिवस – जनजागृती"** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर अहवालात कार्यक्रमाच्या आयोजनाची पार्श्वभूमी, उद्दिष्टे, राबविण्यात आलेले उपक्रम, विद्यार्थ्यांचा सहभाग, कार्यक्रमाची फलनिष्पत्ती व निष्कर्ष यांचा सविस्तर आढावा सादर करण्यात येत आहे.

कार्यक्रमाची पार्श्वभूमी: केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालयाने देशभरात वीर बाल दिवस साजरा करण्याबाबत सर्व राज्यांना सूचना दिल्या. त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्य शासनाने उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, कला शिक्षण तसेच ग्रंथालय संचालनालय यांच्यामार्फत सर्व महाविद्यालये, विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांना जनजागृतीपर कार्यक्रम, व्याख्याने, स्पर्धा व विविध उपक्रम आयोजित करण्याचे निर्देश दिले.

या शासन निर्देशांच्या अनुषंगाने MET-BKC-IOE, नाशिक येथे संस्थात्मक स्तरावर नियोजन करून विद्यार्थ्यांमध्ये वीर बालकांच्या जीवनकार्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी एक व्यापक कार्यक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्दिष्टे

1. वीर बाल दिवस साजरा करण्यामागील प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती :
2. भारतीय इतिहासातील वीर बालकांचे शौर्य, त्याग व बलिदान यांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे.
3. विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करणे.
4. सामाजिक, नैतिक व सांस्कृतिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करणे.
5. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास चालना देणे.
6. तरुण पिढीला राष्ट्रनिर्मितीसाठी प्रेरित करणे.
7. शासकीय धोरणे व राष्ट्रीय उपक्रमांविषयी जनजागृती करणे.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्राचार्य डॉ. विजयकुमार वाणी यांनी उद्घाटनपर मनोगत व्यक्त करताना वीर बाल दिवसाचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी बालकांमधील देशप्रेम, शौर्य व बलिदानाची भावना ही राष्ट्राच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमाचा मुख्य भाग म्हणून **"वीर बाल दिवस – जनजागृती"** या विषयावर माहितीपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. व्याख्यानाचे मुद्दे वीर बाल दिवसाची संकल्पना व उद्देश, गुरु गोविंदसिंगजी महाराजांचे चार साहिबजादे, बाल शहीदांचे राष्ट्रासाठी योगदान, आजच्या युवकांनी इतिहासातून घ्यावयाचे धडे, राष्ट्रनिर्मितीत तरुणांची भूमिका. व्याख्यानादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना मार्गदर्शकांनी सविस्तर उत्तरे दिली. कार्यक्रमास प्रथम वर्ष तसेच उच्च वर्षातील विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग लाभला. प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थितीही उल्लेखनीय होती. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण सहभाग नोंदविला.


या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वीर बाल दिवसाविषयी जागरूकता निर्माण झाली, इतिहासातील बलिदानाची जाणीव विद्यार्थ्यांना झाली, राष्ट्रप्रेमाची भावना अधिक दृढ झाली, विद्यार्थ्यांच्या विचारप्रक्रियेत सकारात्मक बदल दिसून आला.


वीर बाल दिवस – २०२५ निमित्त MET-BKC-IOE, नाशिक येथे आयोजित केलेला जनजागृती कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणे पार पडला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, सामाजिक जाणीव व नैतिक मूल्यांची बीजे रोवली गेली. अशा प्रकारचे उपक्रम नियमितपणे राबविल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल, असा निष्कर्ष काढता येतो.

विद्यार्थी आणि सर्व विभाग प्राध्यापकांच्या सक्रिय सहभागामुळे कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला. समारोप सत्रात प्राचार्य डॉ. विजयकुमार वाणी यांनी सर्वांचे आभार मानून भविष्यामध्येही अशा सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन केले. प्रा. योगेश पाटणी यांनी समन्वयक म्हणून कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण झाल्याबद्दल सर्वांच्या सहकार्याचे कौतुक केले. डॉ. संभाजी पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या प्रसंगी महाविद्यालयातील विविध विभाग प्रमुख आणि प्राध्यापक वर्ग देखील उपस्थित होते. त्यामध्ये डॉ. श्यामकुमार काळपांडे, डॉ. विठ्ठल गोंड, डॉ. शामराव गुमास्ते, डॉ. प्रशांत यावलकर, डॉ. पवन घुमरे, डॉ. दीपक कदम, डॉ. पुंडलिक जाधव, डॉ. विनोद खैरनार आणि डॉ. नमिता काळे यांचा सक्रिय सहभाग होता. ग्रंथपाल डॉ. संभाजी पाटील यांनी सर्व प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थी यांचे मनःपूर्वक आभार मानले.

| | | |
|---|---|---|
| डॉ. संभाजी पाटील | प्रा. योगेश पाटणी | डॉ. विजयकुमार वाणी |
| ग्रंथपाल | राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी | प्राचार्य |




डॉ. संभाजी पाटील
ग्रंथपाल

प्रा. योगेश पाटणी
राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी

डॉ. विजयकुमार वाणी
प्राचार्य